महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
Web : www.dhepune.org.in E-mail : budget.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६१२२१११, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. - अर्थसं - २०१५ /( /१५)/रा यो./ लेखा २ 5719 दि. १३ मे २०१५

प्रति,

सर्व आहरण व संवितरण अधिकारी
( उच्च शिक्षण )

**विषय - बीम्स प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकारी यांना दिलेली प्रधिकार पत्र रद्द (undo) करण्याच्या सुविधेबाबत**

**संदर्भ -** वित्त विभाग परिपत्रक क्र संकीर्ण १०१०/ प्र क्र ७८/ कोषा प्र -५ दि. १२ फेब्रूवारी २०१५

उपरोक्त विषयाकित संदर्भीय शासन परित्रकाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शासन परिपत्रकान्वये बीम्स प्रणालीवरील प्रधिकारपत्र रद्द करण्याची (undo) सुविधा आहरण व संवितरण अधिका-या करिता बंद करण्यात आलेली आहे.

प्राधिकार पत्र रद्द करुन पून्हा नवीन प्राधिकारपत्र तयार करावयाचे असल्यास याबाबतची कार्यपध्दती दि.१२/२/२०१५ च्या शासन परिपत्रकामध्ये देण्यात आलेली आहे. या शासन परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या माहितीसह प्राधिकार पत्र रद्द करण्याचा प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात यावा.

प्राधिकार पत्र तयार करताना, रक्कम तपासून ती बरोबर असल्याची खात्री केल्यानंतरच प्राधिकार पत्र काढण्यात यावे. वारंवारं प्राधिकार पत्र रद्द करण्याची वेळ येणार नाही याची दक्षता संबधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावयाची आहे.

प्राधिकार पत्र रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव विहित वेळेत सादर न झाल्यास व त्यामुळे वेतन अनुदान तसेच इतर अदायगी करण्यास विलंब झाल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत,

सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण ) यांना कळविण्यात येते की , उपरोक्त बाबत आपल्या विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

बीम्स् प्रणालीवर आहरण व संवितरण आधिकारी यांना दिलेली प्राधिकारपत्र रद्द (Undo ) करण्याची सुविधा बंद करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण-१०१०/ प्र.क्र.७८/ कोषा प्र-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १२ फेब्रुवारी, २०१५

वाचा -

शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र. संकीर्ण-१०१०/ प्र.क्र.७८/ कोषा प्र-५, दि१८/१२/२०१०.

शासन परिपत्रक:

राज्य शासनाच्या सर्व विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना BEAMS प्रणालीद्वारे अर्थसंकल्पानुसार अनुदान दिले जाते. BEAMS प्रणालीवर योजनानिहाय प्राधिकारपत्र (BDS Slip) तयार करुन ते देयकासोबत कोषागारात सादर केले जाते. संदर्भाधीन दि.१८/१२/२०१० च्या शासन परिपत्रकानुसार देयक आक्षेपित झाल्यास सदर प्राधिकारपत्र रद्द करावयाची सुविधा आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना उपलब्ध आहे.

बीम्स् प्रणालीवरील प्राधिकारपत्र रद्द करण्याची (Undo) सुविधा आहरण व संवितरण अधिकाऱ्याकरिता बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालील आदेश देण्यात येत आहेत.

१) यापुढे बीम्स् प्रणालीवर प्राधिकारपत्र रद्द (Undo) करण्याची आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकरिता असलेली सुविधा बंद करण्यात येत आहे.

२) प्राधिकारपत्र रद्द करुन पुन्हा नवीन प्राधिकारपत्र तयार करावयाचे असल्यास ही सुविधा संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे बीम्स् प्रणालीवरील नियंत्रक अधिका-यास उपलब्ध राहील.

३) स्वत: आहरण व संवितरण असलेले आधिकारी व विधानसभा/विधानपरिषद सदस्य (Self-Drawing & Disbursing Officer) यांना सदर परिपत्रकातून सूट देण्यात येत आहे.

४) याबाबतची दुरुस्ती बीम्स प्रणालीवर करण्यात यावी.

५) आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्राधिकारपत्र तयार करतेवेळेस रकमा, अदात्याचे नाव व इतर तपशील अचूक भरावा व त्यानंतरच देयक प्राधिकारपत्र काढावे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी काढण्यात आलेले देयक प्राधिकारपत्र रद्द (Undo) करावयाचे असल्यास, सदरचे देयक प्राधिकारपत्र रद्द (Undo) करण्याची सविस्तर कारणे, तसेच कोणत्या परिस्थितीत ते रद्द करणे भाग पडले आहे, त्याच्या तपशिलासह आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने नियंत्रक अधिका-यास लेखी स्वरुपात कळवावीत. तद्नंतरच नियंत्रक अधिका-याकडून सदर देयक प्राधिकारपत्र रद्द (Undo) करण्यात येईल. देयक प्राधिकारपत्राच्या वैधता कालावधी बाबतच्या सूचना संदर्भीय दिनांक १८-१२-२०१० च्या परिपत्रकाप्रमाणे कायम राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५०२१२१६४९१७९००५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN BHASKAR RINGANE

Digitally signed by NARAYAN BHASKAR RINGANE
DN: CN = NARAYAN BHASKAR RINGANE, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Finance Department
Date: 2015.02.13 12:47:11 +05'30'

(ना.भा.रिंगणे)

उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

२.सर्व सन्मानिय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य,

३.राज्यपालांचे सचिव

४.मुख्यमंत्र्यांचे सचिव

५.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

६.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

७.मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.

८.प्रबंधक, मुळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

९.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई

१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई

११.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२

१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१

१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई

१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

१७.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई

१८.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१९.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई

२०.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२१.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली

२२.सर्व विभागीय आयुक्त

२३.सर्व जिल्हाधिकारी